GOVERNMENT OF MAHARASHTRA

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे**

यांचे कार्यालय, नविन मध्यवर्ती इमारत, १ ए.बी.रोड, पुणे-४११००१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२८४६/४७ Email- comm.housing20@gmail.com

जा.क्र.गृह/डी-३/सह.गृह.संस्था/दस्त छायाप्रत शुल्क/२०२६/९५४६ दि. १७ सप्टेंबर,२०२६

## *** परिपत्रक ***

**विषय**:- सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या दस्तऐवजांच्या छायाप्रतीसाठी सदस्यांना द्यावयाचे शुल्क विहित करणेबाबत.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या दस्तऐवजाचे निरीक्षण करण्याच्या सदस्यांच्या हक्काबाबतची तरतूद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४ब- ८ मध्ये आहे. त्यातील पोटकलम (१) नुसार संस्थेच्या प्रत्येक सदस्यास, संस्थेच्या कार्यालयात, कामकाजाच्या वेळात किंवा त्या प्रयोजनासाठी ठरविलेल्या कोणत्याही वेळी अधिनियम, नियम व उपविधि यांची प्रत आणि शेवटचा लेखापरीक्षा झालेला वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा याचा लेखा, समितीच्या सदस्यांची यादी, सदस्यांची नोंदवही, सर्वसाधारण बैठकीची कार्यवृत्ते, समितीच्या बैठकीची कार्यवृत्ते आणि त्याने संस्थेशी केलेले व्यवहार ज्यात नमूद केले आहेत, अशी पुस्तके व अभिलेख यांचे भाग विनामुल्य तपासण्याचा / पाहण्याचा हक्क आहे.

कलम १५४ब- ८ (२) नुसार, सदस्याने पूर्वगामी पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही दस्तऐवजांच्या छायाप्रतींची मागणी केल्यास आणि निबंधकाने विहित केलेले शुल्क सदस्याने भरल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत कोणत्याही सदस्याला देईल आणि जेथे संस्थेला भाग भांडवलाच्या, कर्जाच्या किंवा जमिनीच्या स्वरूपात शासनाकडून सहाय्य देण्यात आले असेल त्याबाबतीत उक्त संस्था, सदस्याने अशी विनंती केल्याच्या तीस दिवसांच्या आत अशी माहिती देईल.

तथापि, निबंधकाने सदर दस्तऐवजांच्या छायाप्रतींच्या दर विहित करून देणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार पुढील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे दर विहित करण्यात येत आहेत.

| अक्र | दस्तऐवजाचा प्रकार | विहित शुल्क दर |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ ची प्रत | पुस्तकावर नमुद दराप्रमाणे |
| २ | उपविधीची प्रत | रु.५/- प्रति पृष्ठ |
| ३ | शेवटचा लेखापरीक्षा झालेला वार्षिक ताळेबंद | रु.५/- प्रति पृष्ठ |
| ४ | नफा-तोटा याचा लेखा | रु.५/- प्रति पृष्ठ |
| ५ | समितीच्या सदस्यांची यादी व सभासदांची नोंदवही | रु.५/- प्रति पृष्ठ |
| ६ | सर्वसाधारण सभा व समितीच्या बैठकीची कार्यवृत्ते / इतिवृत्ते | रु.५/- प्रति पृष्ठ |
| ७ | सभासदाने संस्थेशी केलेले व्यवहार ज्यात नमूद केले आहेत, अशी पुस्तके व अभिलेख यांचे भाग | रु.५/- प्रति पृष्ठ |

(दिपक तावरे भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत उचित अंमलबजावणीस्तव** :-

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२. सहनिबंधक/ उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (एसआरए/ सिडको/ म्हाडा/ एमएमआरडीए)

३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीसाठी** :- मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

(**टिप**- सदर परिपत्रक सहकार आयुक्त व निबंधक, स.सं., म.रा., पुणे यांच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)